# भिवंडीत निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीत भाजपा - काँग्रेस गटात हाणामारी

## लाठ्याकाठ्या दगडांचा मारा; कार्यकर्त्यांमधील शाब्दिक बाचाबाचीतून हाणामारीची घटना

**भिवंडी : पुढारी वृत्तसेवा**

भिवंडी पालिका सार्वत्रिक निवडणुकीत खऱ्या अर्थाने प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली असताना शनिवारी सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास नारपोली भंडारी चौक या ठिकाणी भाजपा व काँग्रेस उमेदवारांच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची होऊन हाणामारीची घटना घडली आहे.

या घटनमध्ये दोन्ही बाजूकडून लाठ्या काठ्या व दगडांचा मारा करण्यात आल्याने दोघेजण जखमी झाले आहेत. या घटनेनंतर परिसरामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणामुळे या ठिकाणी मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.



भंडारी चौक नारपोली येथे भाजपा उमेदवार व काँग्रेसचे उमेदवार यांचे कार्यालय हे रस्त्यामध्ये समोरासमोर आहेत. सायंकाळी काँग्रेस उमेदवारांची प्रचार रॅली या भागात आल्यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी जाणूनबुजून भाजपा कार्यालयाकडे जात घोषणाबाजी केली. ज्यामुळे दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. त्याचे पर्यवसान हाणामारीत झाल्यानंतर दोन्हीकडून प्लास्टिक खुर्च्या लाठ्या काठ्या व दगड भिरकावण्यात आले. विशेष म्हणजे या चौकामध्ये बंदोबस्तावर पोलीस तैनात असतानाच रॅलीत सुद्धा पोलीस होते. त्यांच्या देखत काँग्रेस कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा आरोप भाजपच्या उमेदवाराने केला आहे. तर काँग्रेसकडूनही भाजपच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान या हाणामारीच्या घटनेनंतर नारपोली व भोईवाडा पोलीस ठाण्यातील मोठा पोलीस फौजफाटा घटनास्थळी दाखल होत त्यांनी सौम्य लाठी चार्ज करून परिसरातील गर्दी पांगवण्यात आली. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे यांनी भेट देत परिस्थिती शांत केली आहे. दोन्ही बाजूकडून पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात येत आहे.

### पोलीस फौजफाटा तैनात

भिवंडी पालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची होत झालेल्या हाणामारीच्या घटनेमुळे परिसरातील वातावरण काही काळ तणावाचे झाले होते. दरम्यान निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वातावरण अधिक तंग होऊ नये म्हणून परिसरातील गर्दी तत्काळ पांगवण्यात आली. दरम्यान या ठिकाणी पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner

# भिवंडीत भाजप आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा

◆ ठाणे (वार्ताहर) :

भिवंडी महापालिका निवडणुकीच्या प्रचार रॅली दरम्यान भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये झाला. या राड्यात कार्यकर्त्यांनी खुर्च्यांची फेकाफेक आणि दगडफेक केल्याची घटना घडली. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांची डोकी फोडली गेल्याची घटना घडली आहे. या घटनेने परिसरात काही काळ तणावसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडी पालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत दोन पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. भंडारी चौक नारपोली येथील वॉर्ड क्रमांक २० मध्ये भाजप उमेदवार यशवंत टावरे व काँग्रेस उमेदवार जितेंद्र पाल यांचे कार्यालय रस्त्यात समोर समोर आहेत. शनिवारी काँग्रेस उमेदवाराने आपली प्रचार रॅली काढली होती. या रॅली दरम्यान काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालय समोर घोषणाबाजी केल्याची माहिती समोर आली.

या घटनेमुळे भाजप कार्यकर्ते प्रचंड चिडले. त्यामुळे



भाजप आणि काँग्रेसमध्ये सुरुवातीला वादावादी झाली. या वादानंतर खुर्च्यांची फेकाफेक, दगडफेक झाल्याची घटना घडली. कार्यकर्ते इतक्यावर थांबले नाही तर त्यांनी बांबूची देखील फेकाफेक केली. या घटनेत अनेक कार्यकर्ते रक्तबंबाळ झाले होते. या दरम्यान पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना आवरण्याचा प्रयत्न केला होता. पण कार्यकर्ते वाद शमवायला तयार नव्हते. शेवटी पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. पण या घटनेने परिसरात तणाव निर्माण झाला होता. या घटनेत दोन कार्यकर्ते जखमी झाले आहेत. या जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

Scanned with OKEN Scanner

# भिवंडीत भाजप, काँग्रेसमध्ये प्रचारादरम्यान तुफान राडा



**भिवंडी :** भिवंडी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली असताना शनिवारी सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास नारपोली भंडारी चौक या ठिकाणी प्रभाग क्रमांक २० येथील भाजप आणि काँग्रेस उमेदवारांच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची होऊन तुफान राडा झाल्याची घटना घडली. या राड्यात दोन्ही बाजूंकडून लाठ्या, खुर्च्या व दगडांचा मारा केल्याने दोन जण जखमी झाले आहेत. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

भंडारी चौक नारपोली येथील वॉर्ड क्रमांक २० येथे भाजप उमेदवार यशवंत टावरे व काँग्रेस उमेदवार जितेंद्र पाल यांचे कार्यालय रस्त्यात समोरा-समोर आहेत. सायंकाळी काँग्रेस उमेदवारांची प्रचार रॅली या भागात आल्यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी जाणूनबुजून भाजप कार्यालयाकडे जात घोषणाबाजी केली. ज्यामुळे दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. त्याचे पर्यावसान हाणामारीत झाल्यानंतर दोन्हीकडून प्लास्टिक खुर्च्या, लाठ्या व दगड भिरकावण्यात आले. विशेष म्हणजे या चौकात बंदोबस्तावर पोलीस तैनात असतानाच रॅलीतसुद्धा पोलीस होते. या हाणामारीच्या घटनेनंतर नारपोली व भोईवाडा पोलीस ठाण्यातील मोठा पोलीस फौजफाटा घटनास्थळी दाखल होत त्यांनी सौम्य लाठी चार्ज करून परिसरातील गर्दी पांगवली असून या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे यांनी भेट देत परिस्थिती शांत केली आहे. तर, दोन्ही बाजूकडून स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner

# भाजप-काँग्रेस गटांत हाणामारी

भिवंडी, ता. ३ (वार्ताहर) : प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना भिवंडीतील नारपोली चौकात शनिवारी सायंकाळी भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. एकमेकांवर लाठ्या-काठ्यांनी हल्ला करीत दगडफेक केल्याने दोघे जखमी झाले. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण असून, मोठा पोलिस फौजफाटा तैनात केला आहे.

भंडारी चौकात समोरासमोर भाजप उमेदवार यशवंत टावरे व काँग्रेस उमेदवार जितेंद्र पाल यांचे कार्यालय आहे. सायंकाळी काँग्रेस उमेदवारांची प्रचार रॅली या भागात आल्यानंतर कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालयाकडे जात घोषणाबाजी केली. यामुळे दोन्ही गटांतील कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली. त्याचे पर्यवसान हाणामारीत झाले. » पान ९ वर

# भाजप-काँग्रेस गटात हाणामारी

» पान १ वरून

दोन्हींकडून खुर्च्या, लाठ्या-काठ्या व दगड भिरकावण्यात आले. विशेष म्हणजे, या चौकात बंदोबस्तावर पोलिस तैनात असतानाच रॅलीतसुद्धा पोलिस होते. त्यांच्यादेखत काँग्रेस कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा आरोप भाजप उमेदवार यशवंत टावरे यांनी केला आहे. काँग्रेस नगरसेविका वैशाली म्हात्रे यांची मुलगी हर्षाली यांनी भाजप कार्यकर्त्यांनी हल्ला केल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, या हाणामारीच्या घटनेनंतर नारपोली व भोईवाडा पोलिस ठाण्यातील मोठा पोलिस फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला. त्यांनी सौम्य लाठीचार्ज करून परिसरातील गर्दी पांगवली. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे, सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन सांगळे यांनी भेट देत परिस्थिती शांत केली आहे. दोन्ही बाजूकडून पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner

# भिवंडीत प्रचाराच्या रणधुमाळीत भाजप-काँग्रेस गटात राडा

**भिवंडी :** भिवंडी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी सुरू असतानाच शनिवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास नारपोली भंडारी चौक परिसरात भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा झाल्याची घटना घडली. या घटनेत लाठ्याकाठ्या, प्लास्टिक खुर्च्या आणि दगडांचा मारा झाल्याने दोन्ही बाजूंचे दोन कार्यकर्ते जखमी झाले आहेत.

प्रभाग क्रमांक २० मधील भाजप उमेदवार यशवंत टावरे आणि काँग्रेस उमेदवार जितेंद्र पाल यांची प्रचार कार्यालये समोरासमोर असल्याने परिसर आधीपासूनच संवेदनशील आहे. सायंकाळी काँग्रेस उमेदवारांची प्रचार रॅली या भागातून जात असताना काँग्रेस कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी केल्याने दोन्ही गटांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. हीच वादावादी पुढे जाऊन हाणामारीत रूपांतरित झाली.


या गोंधळात दोन्ही बाजूकडून लाठ्याकाठ्या आणि दगडफेक करण्यात आली. विशेष म्हणजे, घटनास्थळी पोलीस बंदोबस्त तैनात असतानाही हा प्रकार घडल्याने पोलीस व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. भाजप उमेदवार यशवंत टावरे यांनी, "पोलिसांच्या उपस्थितीत काँग्रेस कार्यकर्त्यांनी आमच्या कार्यालयावर दगडफेक केली," असा आरोप केला आहे. तर काँग्रेस नगरसेविका वैशाली म्हात्रे यांच्या कन्या हर्षाली म्हात्रे यांनी भाजप कार्यकर्त्यांनी आमच्यावर हल्ला केल्याचा प्रत्यारोप केला आहे.

घटनेनंतर नारपोली आणि भोईवाडा पोलीस ठाण्यांतील मोठा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला.



दै. पुण्यनगरी दि. ०४/०१/२०२६

# भिवंडीत भाजप-काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी



## तणावपूर्ण वातावरण, बंदोबस्तात वाढ

**भिवंडी :** भिवंडी शहरामध्ये महानगरपालिका निवडणुकीचे पडघम जोमामध्ये वाजू लागले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर आता विविध पक्षांच्या उमेदवारांनी व त्यांच्या समर्थकांनी प्रचार सुरू केला आहे. प्रचार करत असताना अनेक ठिकाणी प्रतिस्पर्धी उमेदवारांसोबत शाब्दिक बाचाबाची व शिवीगाळ होण्याचे प्रकार घडत आहेत. याबाबत पोलीस ठाण्यांत गुन्हा दाखल होण्याचे प्रकार होत असतानाच शनिवारी सायंकाळी शहरातील नारपोली भागातील भंडारी चौक येथे

भाजप व काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत दगडफेक करण्याची गंभीर घटना घडली. त्यामुळे या भागात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन कडक पोलीस बंदोबस्त तैनात केला. मात्र या घटनेसंदर्भात अद्याप कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झालेला नाही. भिवंडी शहरातील नारपोली भंडारी चौक परिसरात वॉर्ड क्रमांक २० मध्ये भाजप उमेदवार व काँग्रेस उमेदवार यांची कार्यालये समोरासमोर आहेत. सायंकाळी काँग्रेसचे उमेदवार रॅली घेऊन भाजप कार्यालयासमोर येताच काँग्रेस कार्यकर्ते घोषणाबाजी करू लागल्याने प्रतिस्पर्धी कार्यकर्ते व काँग्रेस कार्यकर्ते यांच्यात वादंग झाला. त्यामुळे दोन्ही पक्षांतील कार्यकर्ते संतप्त होत एकमेकांना शिवीगाळ करीत दगडफेक व काठ्यांनी हाणामारी करू लागले. त्यामुळे रस्त्यावरील नागरिकांनी जीव मुठीत धरून पळ काढला. काही क्षणातच तेथे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन बंदोबस्त तैनात केला असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली. या हाणामारीत दोन युवक जखमी झाल्याचे समजते.

Scanned with OKEN Scanner

दै. पुण्यनगरी दि. ०४/०१/२०२६

# भिवंडीत ४३९ उमेदवार रिंगणात

## अधिकृत उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने पक्षांची नाचक्की

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेची निवडणुकीचे वारे जोरात वाहत असून भाजप, काँग्रेस,शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पक्ष व कोनार्क विकास आघाडी,भिवंडी विकास आघाडी,तसेच विविध पक्ष आणि अपक्ष उमेदवारांनी वाजत गाजत उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यामुळे ९० जागांसाठी सुमारे १०३३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. मात्र काही उमेदवारांचे अर्ज छाननी बाद झाले,तर काही ठिकाणी अपक्ष व

काँग्रेस पक्षासह काही अधिकृत पक्षाच्या उमेदवारांनी पक्ष आदेश झुगारून उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने काँग्रेस व इतर काही पक्षांची नाचक्की झाली आहे. पक्ष व अपक्ष उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने भाजप पक्षाला त्याचा फायदा झाला असून सहा ठिकाणी भाजपाचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. आता भिवंडी शहर महापालिकेच्या निवडणूक रिंगणात एकूण ४३९ उमेदवार राहिल्याने निवडणूक चुरशीची होणार आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत २३ प्रभागांसाठी ९० वार्डमध्ये निवडणूक होणार आहे.त्यात दोन प्रभागात तीन सदस्य संख्या आहे.त्यामुळे काँग्रेस, समाजवादी पक्ष,भाजप,शिवसेना (ठाकरे) महाराष्ट्र नवनिर्माण सेना,शिवसेना (शिंदे) कोणार्क विकास आघाडी,वंचित आघाडी,भिवंडी विकास आघाडी व अपक्ष उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल करून जोरदार मोर्चा बांधणी सुरू केली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात आज निवडणूक चिन्ह वाटप असल्याने अपक्ष उमेदवारांनी निवडणूक कार्यालयामध्ये सकाळ पासून मोठी गर्दी केली होती. मागणी केलेले चिन्ह मिळाल्यामुळे अपक्ष उमेदवार हे आनंदी दिसत होते. निवडणूक चिन्ह मिळाल्याने प्रत्येक वार्डामध्ये बैठका व छोट्या-मोठ्या कॉर्नर सभा घेऊन मतदारांशी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे.काही ठिकाणी पक्षाशी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला आव्हान देण्यात आले आहे.

तर काही प्रभागात काँग्रेस व समाजवादी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांनी अर्ज अचानकपणे मागे घेतल्याने पक्ष प्रमुखांची नाचक्की झाली असून त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.बंडखोरी मुळे काही ठिकाणी वार्डांमध्ये शाब्दिक बाचाबाची व शिवीगाळ होण्याचे प्रकार सुरू झाले आहेत त्यामुळे पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून पोलिसांनी गस्त वाढवून बंदोबस्त लावण्यास सुरुवात केली आहे.भिवंडी महापालिकेच्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सात ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कार्यालय असून या कार्यालयात एकूण १०३३ उमेदवारी अर्ज (नामांकने) दाखल झाले होते.



### माघार घेतलेल्या उमेदवारांची संख्या २८३

१ छाननीमध्ये अवैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्राची संख्या ७४ आहे,वैद्य ठरलेल्या नामनिर्देशन पत्राची संख्या ९५९ आहे.वैद्यरित नामनिर्देशित उमेदवारांची संख्या ७२२ तर १जानेवारी २०२६, ते २ जानेवारी २०२६ रोजी माघार घेतलेल्या उमेदवारांची संख्या २८३ आहे.

२ त्यामुळे आता या महापालिकेच्या निवडणुकीत एकूण ४३९ उमेदवार रिंगणात आहे असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली. महापालिकेच्या होणाऱ्या या निवडणुकीमुळे वातावरण ढवळून निघाले असून शहरातील विविध चौकात तसेच रस्त्याच्या किनारी राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांची फोटोसह बॅनरबाजी सुरु झाली आहे.

दै. पुढारी दि. ०४/०१/२०२६

## भिवंडीत ४३९ उमेदवार रिंगणात, २८३ जणांची माघार

**भिवंडी : पुढारी वृत्तसेवा**

भिवंडी पालिकेच्या चुरशीच्या होत असलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत २८३ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर,आता निवडणुकीच्या रिंगणात ४३९ उमेदवार शिल्लक राहिले आहेत.पालिका निवडणुकीत १०३३ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते .अर्ज छाननीमध्ये ७४ उमेदवारी अर्ज बाद झाले आहेत.त्यानंतर अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत २८३ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले.तर २३७ उमेदवारांचे एक पेक्षा अधिक उमेदवारी अर्ज दाखल होते.ते वगळता आता निवडणुकीच्या रिंगणात ४३९ उमेदवार शिल्लक राहिले आहेत.



दै. महाराष्ट्र टाइम्स दि. ०४/०१/२०२६

## भिवंडीत चुरस

**म. टा. प्रतिनिधी, ठाणे**

भिवंडी महापालिकेच्या निडणुकीच्या रिंगणात एकूण ४३९ उमेदवार असल्याचे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. भाजप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (उबाठा), समाजवादी पार्टी अशा सर्वच पक्षातील उमेदवार निवडणुकीसाठी उभे आहेत.

भिवंडी विकास आघाडी (एकता मंच), एआयएमआयएम, आम आदमी पार्टी, कोणार्क विकास आघाडीचे उमेदवार निवडणूक लढवत आहेत. एकंदरीतभिवंडीत पालिकेची निवडणूक अधिक चुरशीची होण्याची शक्यता असून उमेदवार निश्चित झाल्यांनतर पुढील काही दिवस सर्वच उमेदवाराकडून जोरदार प्रचार केला जाईल. दुसरीकडे अपक्ष उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत. काही प्रभागात एक तर काहीमध्ये दोन, तीन अपक्ष उमेदवार आहेत. शनिवारी चिन्ह वाटप करण्यात आले. त्यात अपक्षांना फुटबॉल, गॅस सिलेंडर, बॅट, रिक्षा, ल्यूडो, एअर कंडिनशर, कपाट, शिवणयंत्र, पंखा अशी चिन्हे देण्यात आली आहेत.

Scanned with OKEN Scanner

दै० लोकसत्ता दि० ०४/०१/२०२६

# राज्यात १५,९३१ उमेदवार निवडणूक रिंगणात

## मुंबईत सर्वाधिक १७०० उमेदवार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी एकूण २,८६९ जागांसाठी १५,९३१ उमेदवार रिंगणात आहेत. सर्वाधिक १७०० उमेदवार हे मुंबई महानगरपालिकेत तर सर्वात कमी इचलकरंजीमध्ये २३० उमेदवार नशीब अजमावीत आहेत.

महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यावर शनिवारी अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली. एकूण २४,७७१ उमेदवारी अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ८८४० जणांनी माघार घेतली. किती प्रभागांमध्ये निवडणूक बिनविरोध झाली याची अधिकृत आकडेवारी अद्याप निवडणूक आयोगाने जाहीर केलेली नाही.

### 'कडोंमपा'त ४९० उमेदवार मैदानात

कल्याण डोंबिवली पालिका निवडणूक रिंगणात उमेदवारी अर्ज भरलेल्या एकूण ८६० उमेदवारांपैकी ४९० उमेदवार आता निवडणूक रिंगणात आहेत. ६९५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले, तर उमेदवारी अर्ज मागे घेतलेल्या उमेदवारांची संख्या २०५ आहे

### महापालिकानिहाय एकूण जागा, उमेदवारसंख्या

मुंबई (२२७) - १७००

ठाणे (१३१) - ६५६

नवी मुंबई (१११) - ४९९

वसई-विरार (११५) - ५४७

कल्याण- डोंबिवली (१२२) - ४८९

उल्हासनगर (७८) - ४३२

पनवेल (७८) - २५५

मिरा- भाईंदर (९५) - ४३५

भिवंडी - निजामपूर (९०) - ४३९

निवडणूक निर्णय अधिकारी एक यांच्या कार्यालयातून १३, निवडणूक अधिकारी दोन यांच्या कार्यालयातून २३, निवडणूक अधिकारी तीन यांच्या कार्यालयातून १४, निवडणूक अधिकारी चार यांच्या कार्यालयातून १९, पाच विभागातून ३२, सहा विभागातून १७, सात विभागातून २२, आठ विभागातून २८, निवडणूक निर्णय अधिकारी नऊ विभागातून ३७ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत, अशी माहिती पालिका निवडणूक जनसंपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.

दै० पुण्यनगरी दि० ०४/०१/२०२६

| अ. क्र. | महानगरपालिका | प्रभाग संख्या | सदस्य संख्या | उमेदवारी मागे | अंतिम उमेदवार |
|---|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | २२७ | २२७ | ४५३ | १७०० |
| २ | छ. संभाजीनगर | २९ | ११५ | ५५२ | ८५९ |
| ३ | नवी मुंबई | २८ | १११ | २६९ | ४९९ |
| ४ | वसई-विरार | २९ | ११५ | २८६ | ५४७ |
| ५ | कोल्हापूर | २० | ८१ | २०५ | ३२७ |
| ६ | कल्याण-डोंबिवली | ३१ | १२२ | २०६ | ४८९ |
| ७ | ठाणे | ३३ | १३१ | २६३ | ६५६ |
| ८ | उल्हासनगर | २० | ७८ | १८६ | ४३२ |
| ९ | नाशिक | ३१ | १२२ | ६६१ | ७३५ |
| १० | पुणे | ४१ | १६५ | ९६८ | ११६६ |
| ११ | पिंपरी-चिंचवड | ३२ | १२८ | ४४३ | ६९२ |
| १२ | सोलापूर | २६ | १०२ | ५३२ | ५६४ |
| १३ | अकोला | २० | ८० | १६४ | ४६९ |
| १४ | अमरावती | २२ | ८७ | १५३ | ६६१ |
| १५ | नागपूर | ३८ | १५१ | ३०० | ९९३ |
| १६ | चंद्रपूर | १७ | ६६ | ८३ | ४५१ |
| १७ | लातूर | १८ | ७० | २६८ | ३५९ |
| १८ | परभणी | १६ | ६५ | ११७ | ४११ |
| १९ | भिवंडी-निजामपूर | २३ | ९० | २८३ | ४३९ |
| २० | मालेगांव | २१ | ८४ | २२५ | ३०१ |
| २१ | पनवेल | २० | ७८ | ८८ | २५५ |
| २२ | मिरा-भाईंदर | २४ | ९५ | ११३ | ४३५ |
| २३ | नांदेड-वाघाळा | २० | ८१ | ३७६ | ४९१ |
| २४ | सांगली-मिरज-कुपवाड २० | ७८ | ३०१ | ३८१ | |
| २५ | जळगांव | १९ | ७५ | ३१७ | ३३३ |
| २६ | धुळे | १९ | ७४ | ११९ | ३२० |
| २७ | अहिल्यानगर | १७ | ६८ | ११४ | २८३ |
| २८ | इचलकरंजी | १६ | ६५ | १५३ | २३० |
| २९ | जालना | १६ | ६५ | ४०२ | ४५३ |
| | एकूण | ८९३ | २८६९ | ८८४० | १५९३१ |

Scanned with OKEN Scanner

दै० आपलं महानगर दि० ०४/०१/२०२६

# महापालिका निवडणुकांसाठी राज्यात १५,९३१ उमेदवार

प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा

**मुंबई ।** मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत शुक्रवारी संपल्यानंतर या निवडणुकीतील लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्यानुसार २,८६९ जागांसाठी तब्बल १५,९३१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या मुंबईतील २२७ जागांसाठी १,७०० उमेदवार झुंज देत आहेत. येथून ४५३ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार ठाण्यात २६३ उमेदवारांनी माघार घेतल्याने आता १३१ जागांसाठी ५५६ उमेदवार रिंगणात आहेत. नवी मुंबईत ५५२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने येथे १११ जागांसाठी ८५९ उमेदवार रिंगणात आहेत. नाशिक महापालिकेत १२२ जागांसाठी ७३५ उमेदवार आपले नशीब आजमावत असून ६६१ उमेदवारांनी माघारीच्या दिवशी निवडणुकातून अंग काढून घेतले.

| | |
|---|---|
| मुंबई | १७०० |
| पुणे | १,११६ |
| नाशिक | ७३५ |
| ठाणे | ६५६ |
| केडीएमसी | ४८९ |
| मिरा - भाईंदर | ४३५ |
| वसई-विरार | ५४७ |
| नवी मुंबई | ४९९ |
| उल्हासनगर | ४३२ |
| पनवेल | २५५ |

## अन्य महापालिकांमध्ये उमेदवार संख्या

- **जळगाव:** ७५ जागांसाठी ३३३ उमेदवार
- **धुळे:** ७४ जागांसाठी ३२० उमेदवार
- **अहिल्यानगर :** ६८ जागांसाठी २८३ उमेदवार

वसई - विरार पालिकेच्या ११५ जागांसाठी ५४७, कल्याण - डोंबिवलीच्या १२२ जागांवर ४८९, उल्हासनगरच्या ७८ जागांसाठी ४३२, पुण्यांत १६५ जागांसाठी १,११६, पिंपरी - चिंचवडमध्ये १२८ जागांसाठी ६९२, भिवंडी - निजामपूरमध्ये ९० जागांकरता ४३९, मिरा - भाईंदरमध्ये ९५ जागांसाठी ४३५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

दै० नवभारत टाइम्स दि० ०४/०१/२०२६

# मुंबई सहित 29 महानगरपालिकाओं में कुल 15, 931 उम्मीदवार

**राज्य चुनाव आयोग ने जारी की प्रत्याशियों की फाइनल लिस्ट**

**राज्य चुनाव** आयोग ने मुंबई सहित 29 महानगरपालिकाओं के चुनाव में उम्मीदवारों की फाइनल लिस्ट जारी कर दी। चुनाव आयोग के अनुसार, अब कुल 15, 931 उम्मीदवार मैदान में बचे है। इनमें मुंबई महानगरपालिका के 227 प्रभागों में 1700 उम्मीदवार, नवी मुंबई के 28 प्रभागों में 499, वसई-विरार महानगरपालिका के 29 प्रभागों में 547, कल्याण-डोंबिवली के 31 प्रभागों में 489, ठाणे के 33 प्रभागों में 656, उल्हास नगर में 20 प्रभागों में 432, भिवंडी के 23 प्रभागों में 439, पनवेल में 20 प्रभागों में 255 और मीरा-भाईदर महानगरपालिका के 24 प्रभागों में 435 उम्मीदवार मैदान में हैं।

दै० यशोभूमि दि० 08/01/2026

# भिवंडी : मतपेटियों की सुरक्षा हेतु बनाया जा रहा सुरक्षित स्ट्रांग रूम

**यशोभूमि/प्रतिनिधि**

**भिवंडी।** भिवंडी मनपा चुनाव के लिए मनपा व पुलिस प्रशासन द्वारा तैयारियां पूरी कर ली गई है। 15 जनवरी को होने वाले चुनाव के लिए शहर के विभिन्न स्थानों पर सात क्षेत्रीय चुनाव कार्यालय खोले गए हैं। राज्य चुनाव आयोग के निर्देश पर चुनाव अधिकारी व आयुक्त अनमोल

**तीनों ओर से दीवार बनाकर किया जा रहा है तैयार**

सागर ने इन सभी कार्यालयों में चुनाव निर्णय अधिकारियों, पदाधिकारियों और उनके सहायक अधिकारियों की नियुक्ति की है। अधिकारियों ने बताया कि राज्य चुनाव आयोग के निर्देशों के अनुसार, इन सभी क्षेत्रीय चुनाव कार्यालयों में एक अलग स्ट्रांग रूम बनाने का काम शुरू कर दिया गया है और मतगणना भी यहीं की जाएगी। भिवंडी मनपा चुनाव हेतु मिल्लत नगर में फरहान खान हॉल, भादवड में संपदा नाइक हॉल, कामतघर में वराला देवी माता हॉल, अल्लाज शाह मोहम्मद हॉल, कोंबड पाड़ा में राजय्या गजेंगी हॉल में सात क्षेत्रीय चुनाव कार्यालय बनाए गए हैं । सभी क्षेत्रीय चुनाव कार्यालयों के अंतर्गत सभी ईवीएम मशीनों के बक्सों के लिए अलग से स्ट्रांगरूम बनाने की प्रक्रिया शुरू कर दी गई है और ये स्ट्रांगरूम ईंट की दीवार बनाकर तीन तरफ से पूरी तरह बंद रहेंगे। कमरे में प्रवेश के लिए एक तरफ से रास्ता बनाया जाएगा और मतपेटियों को अंदर रखने के बाद, इसे सबके सामने सील कर दिया जाएगा। स्ट्रांगरूम के चारों ओर कड़ी सुरक्षा व्यवस्था रखी जाएगी। उक्त जानकारी चुनाव अधिकारियों ने दी है। इनमें से मिल्लतनगर में स्थित फरहान हॉल की पहली मंजिल पर मतदान की गई ईवीएम मशीनों के बक्सों के लिए सीमेंट की दीवार वाला कमरा बनाने का काम शुरू हो गया है और कमरे के अन्य हिस्सों को भी तीन तरफ से बंद करने के लिए सख्त उपाय किए गए हैं।




**क्षेत्रीय कार्यालय चुनाव कराने के लिए तैयार**

भिवंडी मनपा का चुनाव 15 जनवरी,2026 मतगणना अगले दिन शुक्रवार 16 जनवरी को सुबह 10 बजे से उसी क्षेत्रीय कार्यालय में होगी। शहर के सभी रिटर्निंग ऑफिसरों के सात क्षेत्रीय कार्यालय चुनाव कराने के लिए तैयार हैं। प्रत्येक मतदान केंद्र के बाहर पुलिस उपायुक्त द्वारा पुलिस सुरक्षा भी प्रदान की गई है। यह चुनाव नए मतदाताओं के लिए विशेष रूप से आकर्षक है और उन्हें भी इस चुनाव का नया अनुभव प्राप्त करने का अवसर मिलेगा।

---

दै० हमारा महानगर दि० 08/01/2026


**भिवंडी मनपा चुनाव**

# मतपेटियों की सुरक्षा के लिए बनाए जा रहे स्ट्रांग रूम

**महानगर संवाददाता**

**भिवंडी**

भिवंडी महानगरपालिका चुनाव को लेकर मनपा प्रशासन और पुलिस विभाग ने तैयारियां लगभग पूरी कर ली हैं। 15 जनवरी 2026 को होने वाले चुनाव के मद्देनजर शहर के विभिन्न हिस्सों में सात क्षेत्रीय चुनाव कार्यालय स्थापित किए गए हैं। राज्य चुनाव आयोग के निर्देशानुसार, इन कार्यालयों में मतपेटियों की सुरक्षा के लिए विशेष स्ट्रांग रूम बनाए जा रहे हैं, जहां मतगणना भी संपन्न होगी। चुनाव अधिकारी एवं आयुक्त अनमोल सागर ने बताया कि राज्य चुनाव आयोग के निर्देशों के तहत सभी क्षेत्रीय चुनाव कार्यालयों में चुनाव निर्णय अधिकारियों, अन्य पदाधिकारियों और सहायक



अधिकारियों की नियुक्ति कर दी गई है। अधिकारियों के अनुसार, प्रत्येक कार्यालय में ईवीएम मशीनों के बक्सों के लिए अलग और सुरक्षित स्ट्रांग रूम तैयार किया जा रहा है। मनपा चुनाव के लिए मिल्लतनगर स्थित फरहान खान हॉल, भदवाड संपदा नाइक हॉल, कामतघर के वराला देवी माता हॉल, अल्लाज शाह मोहम्मद हॉल तथा कोम्बडपाड़ा के राजय्या गजेंगी हॉल सहित कुल सात स्थानों पर क्षेत्रीय चुनाव कार्यालय बनाए गए हैं।

मनपा के 23 निर्वाचन क्षेत्रों में से आरओ-3 और आरओ-4 कार्यालयों के अंतर्गत चार-चार वार्ड शामिल हैं, जबकि शेष पांच क्षेत्रीय कार्यालयों में तीन-तीन वार्ड आते हैं।चुनाव अधिकारियों ने बताया कि सभी क्षेत्रीय कार्यालयों में स्ट्रांग रूम ईंट और सीमेंट की मजबूत दीवारों से तीन तरफ से पूरी तरह बंद किए जा रहे हैं। प्रवेश के लिए केवल एक ही मार्ग रखा जाएगा। मतदान के बाद ईवीएम मशीनों के बक्से रखने के पश्चात स्ट्रांग रूम को सभी की उपस्थिति में सील किया जाएगा। इसके चारों ओर कड़ी पुलिस सुरक्षा व्यवस्था तैनात रहेगी।मिल्लतनगर स्थित फरहान खान हॉल की पहली मंजिल पर ईवीएम मशीनों के बक्सों के लिए सीमेंट की दीवारों वाला स्ट्रांग रूम तैयार करने का कार्य शुरू कर दिया गया है, वहीं अन्य हिस्सों को भी सुरक्षा की दृष्टि से पूरी तरह बंद किया जा रहा है।भिवंडी मनपा चुनाव 15 जनवरी 2026 को संपन्न होगा, जबकि मतगणना अगले दिन शुक्रवार 16 जनवरी को सुबह 10 बजे से संबंधित क्षेत्रीय चुनाव कार्यालयों में की जाएगी।

Scanned with OKEN Scanner

दै० जनादेश दि० ०४/०१/२०२६

# आचारसंहिता पथकाची भिवंडीत बोहोनी

## ४ लाख ४० हजारांची रक्कम जप्त

प्रतिनिधी

भिवंडी, दि. ३ : भिवंडी पालिका सार्वत्रिक निवडणुकी दरम्यान सुरू आदर्श आचारसंहिता कालावधीत भरारी पथकाने साईबाबा तपासणी नाका परिसरात एक जानेवारी रोजी सायंकाळी ५.४५ वाजता च्या सुमारास एका वाहनातून ४ लाख ४० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे.आचारसंहिता पथक प्रमुख तथा अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, तसेच सहायक पथक प्रमुख समीर जवरे यांचे नियंत्रणाखाली भरारी पथक क्रमांक एक चे अधिकारी दीपक हनुमान नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे.

साईबाबा नाका येथे तपासणीदरम्यान चारचाकी वाहन क्रमांक एम एच.०५. ईव्ही.६६६७ या वाहनाची तपासणी करीत असताना वाहनात ४ लाख ४० हजारांची रोख रक्कम आढळून आली. वाहन चालक नरेंद्रसिंग मधुकर देवरे यांच्याकडे सदरची रक्कम कुठून आणली(पान ३ वर


## आचारसंहिता पथकाची भिवंडीत बोहोनी

व कुठे चालवली व काय कामासाठी रक्कम घेतली आहे याबाबतची कागदपत्रांची मागणी केली असता सदरील वाहन चालकांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे भरारी पथकाच्या निदर्शनास आणून दिली नाही. त्यामुळे पथकाने मोजणी व पंचनामा करून रोख रक्कम ४ लाख ४० हजार रुपये पकडल्याबाबत शांतीनगर पोलीस स्टेशन येथे नोंद करून सदरची रक्कम मनपाचे लेखा विभागात जमा करण्यात आली आहे.

Scanned with OKEN Scanner

दै. खबरें आज तक दि. 08/01/2026

# भिवंडी में स्वीप टीम द्वारा अण्णासाहेब जाधव स्कूल में मतदान जनजागरूकता कार्यक्रम



**भिवंडी:** भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका की सार्वत्रिक चुनाव 2025-2026 के अंतर्गत मतदाता जागरूकता कार्यक्रम के तहत पद्मश्री अण्णासाहेब जाधव हाईस्कूल, धामणकर नाका में मतदान जनजागरूकता अभियान आयोजित किया गया।

यह कार्यक्रम आयुक्त अनमोल सागर, अतिरिक्त आयुक्त श्रीमती नयना ससाणे तथा स्वीप कक्ष के नोडल अधिकारी श्रीकांत परदेशी के मार्गदर्शन में संपन्न हुआ। कार्यक्रम का उद्देश्य शहर के नागरिकों को मतदान के महत्व के प्रति जागरूक करना था। इस अवसर पर विद्यालय के शिक्षकगण एवं महिला पालक वर्ग के साथ मतदान की शपथ दिलाई गई तथा पथनाट्य के माध्यम से मतदान का संदेश प्रभावी रूप से प्रस्तुत किया गया। कार्यक्रम के सफल आयोजन हेतु सहायक नोडल अधिकारी श्रीमती कल्पना तलपाड़े, राहुल नाडेकर का विशेष योगदान रहा। साथ ही विद्यालय के प्राचार्य सुधीर घागस, उपाध्यक्ष श्रीमती अरुणा जाधव उपस्थित रहे।

स्वीप पथक से पंडित केणे, सुबोध जाधव, श्रीमती धनश्री मेस्त्री, श्रीमती लीना तारे, पंकजकुमार राऊत, सनी ओव्हाल तथा विकी जाधव ने भी कार्यक्रम में उपस्थित रहकर सक्रिय सहभाग लिया। इस जनजागरूकता अभियान के माध्यम से मतदाताओं को लोकतंत्र में मतदान के अधिकार और उसके महत्व के बारे में प्रेरित किया गया।

Scanned with OKEN Scanner

दै० नवभारत दि० 08/09/2025

# वीडियो बनाकर चुनाव निशान वायरल कर रहे प्रत्याशी

भिवंडी.(सं). आगामी 15 जनवरी को सम्पन्न होने वाले भिवंडी मनपा चुनाव के लिए संबंधित मनपा प्रभागों में नियुक्त चुनाव निर्णय अधिकारियों द्वारा चुनाव लड़ने वाले राजनीतिक दलों सहित अपक्ष उम्मीदवारों को चुनाव चिन्ह का आवंटन कर दिया है.चुनाव चिन्ह का आवंटन होते ही तमाम प्रत्याशी मोबाइल द्वारा और वीडियो बनाकर वोटरों को सोशल मीडिया पर मैसेज कर चुनाव जीतने की मनुहार करना शुरू कर दिया है.सोशल मीडिया पर प्रत्याशियों की मिल रही जानकारी से तमाम वोटरों को बेहद आसानी से क्षेत्र में चुनाव लड़ने वाले तमाम प्रत्याशियों की जानकारी बेहद आसानी से मिलने से मनपसंद उम्मीदवार को वोटिंग किए जाने में आसानी होने के आसार हैं.चुनाव चिन्ह मिलते ही भिवंडी में आज से चुनावी रैलियों द्वारा प्रत्याशियों के चुनाव प्रचार का आगाज शुरू होने के आसार हो गए हैं.

Scanned with OKEN Scanner